ॐ

## ज्ञान प्रबोधिनी संस्कार माला

# गणेश प्रतिष्ठापना पूजा
## (उत्तरपूजेसह)

अंतर्गत वितरणासाठी

# संस्कारांमागची मूळ भूमिका

**चित्रकर्म यथाऽनेकैः रङ्गैः उन्मील्यते शनैः।**
***मानव्यमपि तद्वत् स्यात् संस्कारैः विधिपूर्वकैः ।।**

– पाराशरगृह्यसूत्र हरिहरभाष्य

**कुंचला धरोनि । चित्र जे काढिले ।**
**रंग ते भरिले । जैसे छान ।।**
**मानवी जीवना । येण्यास आकार ।**
**विविध संस्कार । अत्यावश्यक ।।**

वेगवेगळ्या रंगांच्या योगाने हळूहळू चित्र जसे आकारास येत जाते, त्याप्रमाणे माणूसपण हेही पद्धतशीरपणाने केलेल्या संस्कारांमुळे क्रमाक्रमाने उमलत जाते.

एखादे चित्र हे साधे रेखाचित्र असण्यापेक्षा त्यात जेव्हा वेगवेगळे रंग वापरले जातात, त्यावेळी ते निश्चितच अधिक खुलून दिसते. माणसाचे आयुष्य म्हणजे सुद्धा एक चित्र-पटच आहे. जीवन हे सरळ साधे रेखाचित्राप्रमाणे जगता येते. परंतु त्यात संस्काररूपी रंग भरले, तर जीवनातील शोभा नक्कीच वाढते. जीवन अधिक उदात्त, उन्नत, उत्तम बनू शकते. चित्रात रंग भरताना रंगसंगती अनुकूल साधणे महत्त्वाचे असते. तसे हे संस्कारही योग्य रितीने केले जाणे आवश्यक आहे. यामध्ये संस्कारांमागचा अर्थ समजावून घेतला जाणे सगळ्यात महत्त्वाचे आहे.

म्हणूनच ज्ञानप्रबोधिनीने अशा प्रत्येक संस्काराच्या सार्थ पोथ्या तयार केल्या आहेत. त्यायोगे, केल्या जाणाऱ्या संस्कारामागचा मूळ अर्थ, मूळ उद्देश सर्वसामान्यांच्याही ध्यानात येईल.

*ब्राह्मण्यमपि

# श्रीगणेश–प्रतिष्ठापना–उपासना

## प्रस्तावना

गणेशोत्सव हा सर्वांचा, अगदी सामान्यांचाही उत्सव आहे. पूर्वीच्या काळी केवळ घराघरांमध्ये होणाऱ्या या उत्सवाला लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक स्वरूप देऊन त्या माध्यमातून लोकजागरण आणि लोकसंघटन करण्याचा प्रयत्न केला.

श्रीगणेश–प्रतिष्ठापनेचा जो पारंपरिक विधी आहे, त्यात मूर्तिपूजेमागील अद्वैत तत्त्वज्ञानाची भूमिका स्पष्ट करणारा भाग जोडून ही नवीन पुस्तिका तयार केली आहे. प्रस्तुत पुस्तिकेमध्ये प्रारंभी स्वत:ची आणि परिसराची शुद्धी, संकल्प, पूजा साहित्याचे पूजन इत्यादी प्राथमिक विधी केल्यानंतर वेद–उपनिषदांतील मंत्रांपासून ज्ञानेश्वरीतील विविध वचनांचा आधार घेत; सर्व सृष्टी कशी एका ब्रह्मतत्त्वाने भरलेली आहे, ते स्पष्ट केले आहे. प्रतिष्ठापनेसाठी चैतन्याला आवाहन आणि सर्वात शेवटी अशा प्राणप्रतिष्ठित मूर्तीची पूजा आणि आरती असा विधी आहे. पुस्तिकेच्या शेवटी उत्तरपूजेचा विधी दिला आहे.

गणेशोत्सव सार्वजनिक करण्यामागे लोकमान्य टिळकांची जी भूमिका होती, ती थोड्याफार फरकाने आजच्या परिस्थितीतही सुसंगत आणि उपयुक्त आहे. त्या दृष्टीने पाहता सध्याच्या सार्वजनिक गणेश–मंडळांनी त्या उत्सवामागील जो सामाजिक आशय ध्यानात ठेवायला हवा, त्याचीही मांडणी या पुस्तिकेत गद्य प्रार्थनेच्या स्वरूपात केली आहे.

सार्वजनिक गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना विविध जातिधर्मांच्या, व्यक्तींच्या हस्ते करण्याचा चांगला पायंडा आता पडला आहे. आता त्यापुढची पायरी म्हणजे प्रतिष्ठापनेचे पौरोहित्य करणे हे सुद्धा सर्व जातिधर्मांच्या स्त्रीपुरुषांना शक्य झाले पाहिजे.

कोणीही साक्षर, संस्कृतचा थोडा सराव करू इच्छिणारी व सश्रद्ध व्यक्ती असे पौरोहित्य करू शकेल. गेली अनेक वर्षे या पोथीचा वापर प्रबोधिनीत व बाहेरही चालू आहे.

गणेशोत्सवात त्या त्या मंडळातील संयोजकांनी आपल्याच भागातील पुरोहित तयार करून श्रींची प्रतिष्ठापना करणे शक्य आहे. रूढीने व परंपरेने ज्यांना पौरोहित्याचा अधिकार नाही असे समजले जाते, अशा जातिधर्मांतील स्त्री–पुरुषांना यात प्राधान्य द्यावे.

**गिरीश बापट**
**ज्ञान प्रबोधिनी पुणे.**

# द्वितीय आवृत्तीची प्रस्तावना

श्रीगणेशप्रतिष्ठापनेची ज्ञान प्रबोधिनीप्रणीत पोथी गेली सुमारे ४० वर्षे ज्ञा. प्र.च्या विविध केंद्रांवर वापरली जात आहे. त्यामागील भूमिका श्री. गिरीश बापट यांच्या प्रस्तावनेत मांडली आहे.

ज्ञान प्रबोधिनीच्या संस्कारपद्धतीचा समाजात अधिकाधिक प्रमाणात स्वीकार होत असून श्रीगणेशाची प्रतिष्ठापना कोणाही पुरोहितावर अवलंबून न राहता स्वतःला / कुटुंबातील व्यक्तीला करता यावी असे वाटणाऱ्या लोकांची संख्याही वाढत आहे. कुटुंबांप्रमाणे सार्वजनिक मंडळांमधील सदस्यांनीही याबाबत स्वावलंबी व्हावे असे ज्ञान प्रबोधिनीला वाटते.

वरील हेतू ठेवून गेल्या काही वर्षांमधील अनुभवावरून काही थोडे बदल या दुसऱ्या आवृत्तीत केले आहेत. विशेषतः वेगवेगळ्या कृतींसंबंधीच्या सूचना अधिक नेमक्या स्वरूपात दिल्या आहेत. तसेच संस्कृतमधील संधिनियमानुसार काही वेळा विशिष्ट अक्षरावर आघात द्यावा लागतो. मंत्रातले / श्लोकांमधील काही असे भाग कंसात दाखवले असून आघात देण्याचे अक्षर द्वित्वरूपात म्हणजे दोनदा छापले आहे.

ज्ञान प्रबोधिनीच्या अन्य पोथ्यांप्रमाणे या पोथीतील सर्व विधीसुद्धा सामूहिक स्वरूपात करणे अपेक्षित असल्यामुळे कुटुंबातील, मंडळातील जी व्यक्ती पूजा सांगत असेल तिला तेथे पुरोहित म्हटले आहे. सर्व उपासकांच्या वतीने एक व्यक्ती यजमान म्हणून बसणे अपेक्षित असून ती प्रतिनिधी म्हणून आवश्यक त्या कृती करेल. अन्य सर्व उपासकांनी मंत्र, श्लोक इ. म्हणण्यात सहभागी व्हावे.

श्रीगणेशाला अर्पण केल्या जाणाऱ्या २१ पत्रींचे गुणधर्मही या पोथीच्या शेवटी दिले आहेत. गणेशभक्तांनी त्याचा उपयोग करावा अशी इच्छा आहे.

या आवृत्तीत जे बदल केले आहेत त्यासंबंधीचे बहुतांश काम ज्ञान प्रबोधिनीतील संत्रिका (संस्कृत-संस्कृति-संशोधिका) या विभागात पौरोहित्याचे प्रशिक्षण देणाऱ्या वाच. आर्या जोशी यांनी केले आहे. या आवृत्तीचे टंकलेखन सौ. उज्ज्वल पवार यांनी केले.

**पुनर्मुद्रण : प्रती - ३००**
**राष्ट्रीय सौर १४ आषाढ शके १९४६**
**दि. ५ जुलै २०२४**
**मुल्य रु. ३०/-**


**विश्वनाथ गुर्जर**
**ज्ञान प्रबोधिनी**
**संस्कृत संस्कृति संशोधिका**

## सर्वसाधारण सूचना

पोथीमध्ये आलेला ठळक अक्षरातील भाग पुरोहितांपाठोपाठ उपस्थित सर्वांनी म्हणावा. गद्यातील भाग फक्त पुरोहितांनी अथवा ते सूचना करतील त्यानुसार यजमान आणि /अथवा इतर उपासकांनी म्हणावा.

सामान्यतः कृतीच्या सूचना कंसात दिल्या आहेत आणि अन्य विवेचन मंत्रांच्या आधी/नंतर दिले आहे.

### श्रीगणेश–प्रतिष्ठापना मांडणी नकाशा
### बैठक व्यवस्था




## साहित्याची यादी

पूजेसाठी गणेशाची मूर्ती, हळद, कुंकू, अष्टगंध, अक्षता, अत्तर, कापूर, पंचामृत, कापसाचे वस्त्र, जानवी जोड, फुले, पत्री, दूर्वा, हार, १० विड्याची/आंब्याची पाने, उदबत्ती, उदबत्तीचे घर, भिजवलेल्या फुलवाती आणि तेलवाती, काडेपेटी, नीरांजनासाठी अर्धी वाटी तूप, समईसाठी तेल, तांब्याभर स्वच्छ पाणी, ५ सुपाऱ्या, ५ नाणी, कोमट पाणी, २ कलश, १ फुलपात्र, १ पळी, २ ताम्हने, १ मोठे ताट, ४–५ वाट्या, २ चमचे, नीरांजन, समई, देवाला पुसण्यासाठी १ रूमाल, १ हातपुसणे, चौरंग/पाट, त्यावर घालायला वस्त्र, बसण्यासाठी पाट किंवा आसने, रांगोळी व रंग, ऐच्छिक नैवेद्य.

## पूजेची तयारी

श्रीगणेशस्थापना –पूजेच्या आधी घराची स्वच्छता करावी. दारात सुंदर रांगोळी रेखावी. आकृतीत दाखविल्याप्रमाणे योग्य त्या ठिकाणी चौरंग अथवा पाट ठेवावा. त्यावर वस्त्र घालावे. चौरंगाभोवती रांगोळी काढावी. आकृतीनुसार चौरंगावर उपलब्ध असलेली पूजेची उपकरणे म्हणजे कलश, शंख, घंटा, दीप इ. ठेवावे. चौरंगावर किंवा पाटावर मागे मध्यभागी थोडे तांदूळ ठेवून त्यावर श्रीगणेशाची उत्सवमूर्ती ठेवावी. मूर्तीवर घातलेले वस्त्र किंवा रूमाल काढून ठेवावा. उत्सवमूर्तीच्या पुढे एका छोट्या वाटीत थोड्या अक्षता ठेवून त्यामध्ये गणेशाची धातूची छोटी मूर्ती किंवा सुपारीरूपी गणेश ठेवावा. तांदुळाच्या राशीवर कलश ठेवावा. कलशात पाणी, हळद- कुंकू, गंध, अक्षता, फूल, सुपारी, नाणे, कापूरवडी घालावी. कलशाच्या मुखावर विड्याची/ आंब्याची पाने लावावीत. कलशावर नारळ ठेवावा.

खारका, बदाम, फळे या पूजेतील अत्यावश्यक गोष्टी नव्हेत. ज्यांना त्या ठेवाव्याशा वाटतील त्यांनी त्या ठेवाव्यात; नंतर प्रसाद म्हणून त्यांचे वाटप करावे.

पूजेला प्रारंभ करण्यापूर्वी यादीनुसार सर्व साहित्याची तयारी करून ठेवावी. पूजास्थानी तेलाची समई प्रज्वलित करून ठेवावी.

## श्रीगणेश प्रतिष्ठापना उपासना

आजच्या या शुभदिवशी श्री गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना आणि पूजा करण्यासाठी आपण एकत्र जमलो आहोत. सर्व चराचरामध्ये, प्रत्येक अणुरेणूत परमेश्वरी शक्ती भरून राहिलेली आहे हे खरे; तथापि भक्ताला भक्ती करण्यास, पूजा करण्यास आनंद वाटावा म्हणून मूर्तीची स्थापना करतात. एवढ्यासाठी श्रीगणेशमूर्तीची स्थापना करून तिच्यात प्राणांची प्रतिष्ठा म्हणजे प्राणप्रतिष्ठा आपण करू इच्छित आहोत.

आजच्या या समारंभाचा प्रारंभ त्रिवार ओंकार व आचमनाने करूया.

## त्रिवार ओंकार व आचमन

अ, उ, आणि म् यांनी युक्त अशा ओंकाराचा उच्चार मनाच्या एकाग्रतेसाठी साहाय्यकारी असतो. (आपण सर्वांनी आता पाठोपाठ तीन वेळा ओंकाराचा उच्चार करावा.)

**हरिः ॐ, ॐ, ॐ**

या पूजेचा आरंभ आचमनाने करूया. आचमन केल्याने कंठाला ओलावा मिळतो आणि मनही शांत होते. आपणा सर्वांचे प्रतिनिधी या नात्याने यजमान प्रत्यक्ष कृती करतील. (आचमनासाठी आपल्या उजव्या हाताची गोकर्ण मुद्रा करा. डाव्या हाताने पळीभर पाणी उजव्या हाताच्या गोकर्ण मुद्रेत घेऊन प्या. पाणी पिऊन झाल्यावर म्हणा) –

**ॐ केशवाय नमः ।** केशवाला नमस्कार असो.

(पुन्हा एकदा गोकर्ण मुद्रेत एक पळी पाणी घेऊन प्या आणि म्हणा) –

**ॐ नारायणाय नमः ।** नारायणाला नमस्कार असो.

(पुन्हा एकदा एक पळी पाणी गोकर्ण मुद्रेत घेऊन प्या आणि म्हणा) –

**ॐ माधवाय नमः ।** माधवाला नमस्कार असो.

(आता चौथ्या वेळी एक पळी पाणी गोकर्ण मुद्रेत घ्या आणि उजव्या हाताच्या मधल्या बोटावरून ते पाणी ताम्हनात सोडा आणि म्हणा)–

**ॐ गोविन्दाय नमः ।** गोविंदाला नमस्कार असो.

आता आपण आजच्या कार्यक्रमासाठी स्वत:ची शुद्धी करूया.

## आत्मशुद्धी

आपण सर्वजण स्नान करून, स्वच्छ वस्त्रे परिधान करून, कपाळाला गंध लावून पूजेसाठी बसलो आहोत. तथापि शरीराच्या पावित्र्याच्या जोडीने मनाची पवित्रताही महत्त्वाची आहे. (त्यासाठी आता डाव्या हातात एक पळी पाण्याने भरून घ्या. उजव्या हातात एक फूल घेऊन ते पळीतील पाण्यात बुडवा. आपल्यावर शांती आणि पावित्र्याचे सिंचन होत असल्याचा अनुभव घेत फुलाने आपल्या मस्तकावर पाणी शिंपडा आणि म्हणा) –

**अपवित्रः पवित्रो वा, सर्वावस्थां गतोऽपि वा ।** (अपवित्रःप्पवित्रो )
**यः स्मरेत् पुण्डरीकाक्षं, स बाह्याभ्यन्तरः शुचिः ।।**
(यस्स्मरेत्)(बाह्याभ्यन्तरश्शुचिः )

मनुष्य पवित्र वा अपवित्र किंवा कोणत्याही अवस्थेत असो, त्याने परमेश्वराचे स्मरण केले तर तो अंतर्बाह्य पवित्र होतो.

स्वत:ची शुद्धी झाल्यानंतर आता या भूमीची, आसमंताची शुद्धी सर्वत्र अक्षता

टाकून करूया. अक्षता हे मांगल्याचे प्रतीक आहे. अक्षता-प्रोक्षणाने सर्वत्र मांगल्याचा, शुभशक्तीचा वर्षाव होत आहे आणि हा सर्व परिसर शुद्ध होत आहे अशी धारणा करावी.

## भूमीशुद्धी

चराचरात भरून राहिलेल्या चैतन्यशक्तीला या गणेशमूर्तीमध्ये आपण प्रतिष्ठित करणार आहोत. तिच्या पूजनापूर्वी या भूमीवरील वाईट प्रवृत्ती आणि कुविचार दूर निघून जावोत अशी प्रार्थना करायची आहे. (त्यासाठी डाव्या हातात थोड्या अक्षता घ्या. उजव्या हाताने त्या अक्षता सर्व दिशा-उपदिशांना तसेच वरच्या दिशेने आणि खाली जमिनीवर टाकताना म्हणा) -

**अपसर्पन्तु ते भूता, ये भूता भूमिसंस्थिताः ।**
**ये भूता विघ्नकर्तारः, ते गच्छन्तु शिवाज्ञया ।।**
**अपक्रामन्तु भूतानि, पिशाचाःसर्वतो दिशम् ।**

(अपक्क्रामन्तु) (पिशाचाःस्सर्वतो)

**सर्वेषाम् अविरोधेन, प्रतिष्ठापनं समारभे ।।**

या भूमीमध्ये ज्या दुष्ट प्रवृत्ती असतील त्या येथून दूर जावोत. कार्यात विघ्न आणणाऱ्या ज्या प्रवृत्ती असतील त्या श्री शिवांच्या आज्ञेने दूर निघून जावोत. अशुभ प्रवृत्तींच्या रूपात असलेली भूते व पिशाच्चे सर्व दिशांना दूर निघून जावोत. सर्व शुभ शक्तींच्या अविरोधाने, सहकार्याने आम्ही आता गणेशमूर्तीच्या प्रतिष्ठापना कार्याला प्रारंभ करीत आहोत.

आता आपण आजच्या कार्यक्रमाचा संकल्प करूया.

## देशकालोच्चारण व संकल्प

संकल्प म्हणजे दृढनिश्चय. सामूहिकरीत्या संकल्प केल्याने तो पूर्ण करण्यास सर्वांचे सहकार्य मिळते. संघटनेची भावना वाढीस लागते. आजच्या या पूजेचा संकल्प सर्वांनी एकत्रितपणे करायचा आहे. (हा संकल्प म्हणताना तुमच्या देशाचे, गावाचे नाव, संवत्सराचे नाव तुम्ही रिकाम्या जागी घालून उच्चारायचे आहे. वार आणि नक्षत्राच्या जागीही योग्य ती माहिती तुम्ही भरायची आहे. उर्वरित संकल्प जसाच्या तसा पाठोपाठ म्हणायचा आहे. संकल्प करण्यासाठी उजव्या हातामधे एक पळी पाणी घेऊन म्हणा)

**इह पृथिव्यां, ......द्वीपे, ...... वर्षे, बौद्धावतारे, .... ग्रामे / नगरे, .... नाम संवत्सरे, वर्षा– ऋतौ, भाद्रपद–मासे, शुक्ल–पक्षे, चतुर्थी –तिथौ, .... वासरे, .... नक्षत्रे, श्रीसिद्धिविनायकमूर्तेः प्राणप्रतिष्ठापूर्वकं श्रीसिद्धिविनायक पूजनं वयं करिष्यामहे ।** (उदक सोडा) (प्राणप्रतिष्ठापूर्वकं)

या पृथ्वीतलावरील, .....द्वीपामध्ये,....देशात, बौद्धावतारात, ..... गावात/ नगरात, ..... नावाच्या वर्षी, वर्षा ऋतूमध्ये, भाद्रपद महिन्यात, शुक्ल पक्षात, चतुर्थी तिथीला, ..... वारी, ..... नक्षत्रावर, श्री सिद्धिविनायकाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून तिचे पूजन आम्ही करीत आहोत.

प्राणप्रतिष्ठेला प्रारंभ करण्यापूर्वी पाणी धारण करणारा कलश, ॐ कार ध्वनी देणारा शंख, देवतांचे आगमन आणि दुष्ट प्रवृत्तींचे निराकरण सुचविणारी घंटा आणि स्वच्छ प्रकाश देणारा दीप यांचे पूजन करूया.

## कलशपूजन

पाणी म्हणजे जीवन. जलाची अधिष्ठात्री देवता वरुण. वरुणाच्या कृपेने नद्या भरभरून वाहतात आणि आपल्या दोन्ही तीरांवरची भूमी सुजला–सुफला करतात. त्यांच्या तीरांवर समृद्ध संस्कृती नांदते. अशा या पवित्र नद्यांचे स्मरण करून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करूया. (मंत्र म्हणत असतांना कलशाला दोन्ही हात लावा. कलशाला स्पर्श करून झाल्यावर, ज्या भांड्यातील पाणी आपण पूजेसाठी वापरणार आहोत त्या भांड्यावरही उजवा हात पालथा ठेवून म्हणा) –

**गङ्गे च यमुने चैव, गोदावरि सरस्वति ।**
**नर्मदे सिन्धु कावेरि, जलेऽस्मिन् सन्निधिं कुरु ॥**

गंगा, यमुना, गोदावरी, सरस्वती, नर्मदा, सिंधु, कावेरी या नद्यांचे पवित्र जल या कलशामध्ये येऊ दे.

(आता कलशाला आणि पूजेचे पाणी असलेल्या भांड्याला गंध, अक्षता आणि फुले वाहताना म्हणा) –

**ॐ कलशदेवतायै नमः । सकलपूजार्थे गन्धाक्षतपुष्पं समर्पयामः ।**

कलशदेवतेला नमस्कार असो. पूजेच्या सर्व उपचारांसाठी म्हणून गंध, अक्षता आणि फुले अर्पण करतो.

## शंखपूजन

शंख उपलब्ध असल्यास त्याचे पूजन आता करायचे आहे. सर्व शंखात श्रेष्ठ असा हा पांचजन्य समुद्रमंथनातून उत्पन्न झाला असे मानले जाते. विष्णूने ज्याला धारण केले आहे अशा या शंखाची स्तुती करताना म्हणा –

**त्वं पुरा सागरोत्पन्नो, विष्णुना विधृतः करे ।** (विधृतःक्करे)
**नमितः सर्वदेवैस्तु, पाञ्चजन्य नमोऽस्तु ते ।।** (नमितस्सर्वदेवैस्तु )

हा निनादणारा शंख पूर्वी सागरातून उत्पन्न झाला आणि भगवान विष्णूने तो हातात धारण केला आहे. सर्व देवांनी याला नमस्कार केला आहे. शंखांत श्रेष्ठ असा जो पांचजन्य, त्याला नमस्कार असो.

(शंखाला फक्त गंध आणि फूल वाहून म्हणा )–

**ॐ शफदेवतायै नमः । सकलपूजार्थे गंधपुष्पं समर्पयामः ।**

शंखदेवतेला नमस्कार असो. पूजेच्या सर्व उपचारांसाठी म्हणून गंध आणि फुले अर्पण करतो.

## घंटापूजन

देवांच्या आगमनासाठी घंटानाद शुभसूचक मानला जातो. घंटेच्या नादाने वाईट प्रवृत्ती दूर निघून जाव्यात अशी भावना करावी. (उजव्या हाताने घंटा वाजवत म्हणा) –

**आगमार्थं तु देवानां, गमनार्थं तु रक्षसाम् ।**
**कुर्वे घण्टारवं तत्र, देवताह्वानलक्षणम् ।।**

देवांच्या, शुभशक्तींच्या आगमनासाठी आणि राक्षसांच्या दुष्ट शक्ती येथून जाण्यासाठी आम्ही घंटानाद करतो.

(आता घंटा जागेवर ठेवून तिला गंध, अक्षता, फुले वाहताना म्हणा ) –

**ॐ घण्टादेव्यै नमः । सकलपूजार्थे गन्धाक्षतपुष्पं समर्पयामः ।**

घंटादेवतेला नमस्कार असो. पूजेच्या सर्व उपचारांसाठी म्हणून गंध, अक्षता आणि फुले अर्पण करतो.

## दीपपूजन

ज्योतीच्या तेजांशाने परब्रह्माला ओवाळायचे आहे. हे दीपपूजन करताना आपल्या मनातील सकारात्मक विचारांचा आणि ज्ञानाचा नंदादीप सदैव प्रज्वलित रहावा अशी मनोमन प्रार्थना करा आणि म्हणा –

**भो दीप ब्रह्मरूपस्त्वं, ज्योतिषां पतिरव्ययः।** (दीपब्‌ब्रह्मरूपस्त्वं)
**आरोग्यं देहि पुत्रांश्च, सर्वार्थांश्च प्रयच्छ मे ।।** (सर्वार्थांश्चप्‌प्रयच्छ)

हे दीपा, तू ब्रह्मस्वरूप आहेस, अनंत ज्योतींच्या पतीसारखा आहेस. तू आम्हाला आरोग्य दे. आमच्या सर्व इच्छा पूर्ण कर.

(आता दिव्याला गंध, अक्षता, फुले अर्पण करताना म्हणा ) –

**ॐ दीपदेवतायै नमः । सकलपूजार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामः ।**

दीपदेवतेला नमस्कार असो. पूजेच्या सर्व उपचारांसाठी म्हणून गंध, अक्षता आणि फुले अर्पण करतो.

## श्रीगणेशाच्या रूपामागील तत्त्वज्ञान

आज आपण या मूर्तीमध्ये श्रीगणेशाची प्रतिष्ठापना करू इच्छीत आहोत. पण गणेश म्हणजे कोण? श्रीगणपति-अथर्वशीर्षात म्हटले आहे-

**त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि। त्वमेव केवलं कर्तासि ।** (त्वमेवप्‌प्रत्यक्षं)
**त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि। त्वं साक्षादात्मासि नित्यं ।**

तूच प्रत्यक्ष मूलतत्त्व आहेस. तूच केवळ कर्ता आहेस. हे सर्व ब्रह्म खरोखरी तूच आहेस. साक्षात् नित्य असलेला आत्मा तूच आहेस.

श्री गणपतीला प्रत्यक्ष ब्रह्म म्हटलेले आहे ते केवळ स्तुती करण्याच्या उद्देशाने नव्हे. श्री गणपती हे परब्रह्माचे प्रतीक आहे असे आपण समजतो. निर्गुण, निराकार पण सत्य, चैतन्य आणि आनंदयुक्त म्हणजेच सत्-चित्-आनंदयुक्त असे जे ब्रह्म आहे त्याचे प्रतीक असलेला गणपती ओंकार-स्वरूप मानला आहे. हा ओंकार अ, उ आणि म् या अक्षरांच्या संयोगाने झालेला आहे. हा ॐ हाच गणपतीचा व पर्यायाने परब्रह्माचा वाचक झाला आहे. वैदिक मंत्रांच्या आरंभी, ग्रंथांच्या आरंभी ॐ लिहून प्रारंभ केला जातो. यजुर्वेदात म्हटले आहे –

**ॐ खं ब्रह्म ।** (वाजसनेयी संहिता ४०।१७)

ॐ हेच सर्वव्यापक (खं) ब्रह्माचे नाव आहे.

तैत्तिरीय आरण्यकात हेच सांगितले आहे.

**ॐ इति ब्रह्म ।** (तैत्तिरीय आरण्यक, अनुवाक ८) (इतिब्ब्रह्म)

ॐ म्हणजेच ब्रह्म. कठोपनिषदातही म्हटले आहे -

**सर्वे वेदा यत् पद्मामनन्ति । तपांसि सर्वाणि च यद् वदन्ति ।**
**यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति । तत्ते पदं सङ्ग्रहेण ब्रवीमि ।।**

(सङ्ग्रहेणब्ब्रवीमि)

**ॐ इति एतत् ।** (कठोपनिषद् १।२।१५)

सर्व वेद ज्या पदाचे वर्णन करतात, सर्व प्रकारचे तप ज्यासाठी आचरले जाते, ज्याची इच्छा धरून ब्रह्मचर्याचे आचरण केले जाते, त्या पदाबद्दल मी संक्षेपाने सांगतो, ते पद म्हणजे ॐ.

परब्रह्मचिंतन म्हणजे ॐ चे चिंतन, परब्रह्मपूजा म्हणजे ॐ ची पूजा. निर्गुण, निराकार अशा परब्रह्माचे ॐ हे काहीसे साकार प्रतीक. पण हे प्रतीकसुद्धा बहुजनमनाला समजत नाही.

बहुजनमनाला काहीतरी त्याहूनही सगुण साकार असे प्रतीक हवे. त्यामुळे गणपती या मूर्तीची कल्पना निघाली. ॐ च्या भोवती मानवरूप घातले की गणपती होतो. श्रीज्ञानदेवांनी त्याची फोड अशी केली आहे की, श्रीगणेशाची आसनमांडी म्हणजे अकार, श्रीगणेशाचे विशाल उदर म्हणजे उकार, महागंडस्थलयुक्त मस्तक म्हणजे मकार ! हे तिन्ही जेथे एकत्र झाले, तेथे शब्दब्रह्म प्रकट झाले ! तेच सर्व ब्रह्मांडाचे बीजरूप आहे. त्याला ज्ञानेश्वर गुरुकृपेने वंदन करून म्हणतात.

**अकारचरण युगुल। उकार उदर विशाल ।**
**मकार महामंडल । मस्तकाकारे।**
**हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळले।**
**ते मिया श्रीगुरुकृपा नमिले। आदिबीज ।।**

(ज्ञानेश्वरी अध्याय १, ओव्या १९-२०)

म्हणून आज आपण गणेशरूपात जणू काही ॐ ची प्रतिष्ठापना करीत आहोत. आपल्यासमोरची मूर्ती आत्ता केवळ मातीची मूर्ती आहे. तिच्यात पंचप्राण यावेत, परब्रह्मशक्तीचे अवतरण तिच्यात व्हावे, अशा प्राणप्रतिष्ठित मूर्तीची आपणास पूजा करता यावी म्हणून आपण परब्रह्मचैतन्याला आवाहन करूया.

## श्रींची प्राणप्रतिष्ठा – आवाहन

आपल्या सर्वांमधील चैतन्य या मूर्तीमध्ये आपण प्रक्षेपित करीत आहोत अशी भावना ठेवून त्रिवार ॐ कार म्हणा –

**ॐ, ॐ, ॐ**

हे परब्रह्मशक्ते, आपण सर्व चराचरात भरलेले आहात. पण आमच्या सुखासाठी, आमच्या हट्टासाठी या मूर्तीमध्ये आपण प्राणप्रतिष्ठित व्हा.

(गणपतीच्या हृदयाला स्पर्श करावा. आणि आवाहन करण्यासाठी म्हणा–)

**आवाहयामि विघ्नेश, सुरराजार्चितेश्वर।**
**अनाथ–नाथ सर्वज्ञ, पूजार्थं गणनायक ।।**

देवांच्या देवाने पूजिलेल्या, सर्व जाणणाऱ्या, विघ्नांचे हरण करणाऱ्या, गणांचा अधिष्ठाता असणाऱ्या हे चैतन्या, आमच्या पूजेचा स्वीकार करण्यासाठी तू या मृण्मय मूर्तीत निवास कर असे आम्ही आवाहन करतो.

आपण आता ध्यान करून चैतन्यशक्ती या मूर्तीत येत आहे अशी भावना करूया.

(सर्वजण काही काळ स्तब्ध राहून मनोमन आवाहन करतात.)

**ॐ, ॐ, ॐ**

या मूर्तीमध्ये आता देवत्व आलेले आहे. आता वेदमंत्रांनी आपण तिचे पूजन करूया.

**ॐ गणानां त्वा गणपतिं हवामहे । कविं कवीनाम् उपमश्रवस्तमम् ।**
**ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पते । आ नः शृण्वन् ऊतिभिः सीद सादनम् ।।**

(ऋग्वेद २/२३/१)

गणांचा स्वामी असणाऱ्या गणराया, आम्ही तुझे स्तवन करतो. तू विद्वानांचा विद्वान आहेस. तुझ्या कीर्तीला उपमा नाही. तूच सर्व प्रार्थनांचा स्वामी आहेस. आमच्या प्रार्थना ऐकून तू आपल्या सर्व संरक्षक कवचासह या आसनावर येऊन बस.

## षोडशोपचार पूजा

आता आपण श्री गणपतीची विविध उपचारांनी पूजा करूया.

(श्री गणेश प्रतिष्ठापना व विसर्जनाच्या दिवशी सर्व उपचार करावेत. इतर

दिवशी चंदनापासून पुढील उपचार करावेत.)

पुढील सर्व उपचार उत्सवमूर्ती व सुपारीरूपी गणपतीवर एकाच वेळी करायचे आहेत. उत्सवमूर्ती खराब होऊ नये अथवा तिला धक्का लागू नये यासाठी उत्सवमूर्तीच्या पुढे एका छोट्या वाटीत थोड्या अक्षता घेऊन त्यावर धातूची छोटी गणेशमूर्ती किंवा सुपारी ठेवावी व तिचेही पूजन करावे.

(दोन्ही गणपतींना थोड्या अक्षता अर्पण करा.)

**श्रीसिद्धिविनायकाय नमः। आसनार्थे अक्षतान् समर्पयामः।**

श्रीसिद्धीविनायकाला नमस्कार असो. आसनासाठी अक्षता समर्पित करतो.

(सुपारी किंवा धातूची छोटी मूर्ती ताम्हनात घ्या. त्यावर दोन पळ्या पाणी अर्पण करा. उत्सवमूर्तीच्या पायांवर एका फुलाने थोडे पाणी शिंपडा.)

**श्रीसिद्धिविनायकाय नमः । पादयोः पाद्यं समर्पयामः ।**

श्रीसिद्धीविनायकाला नमस्कार असो. पाय धुण्यासाठी हे पाणी समर्पित करतो.

(सुपारीरूपी गणेश अथवा धातूच्या मूर्तीवर दोन पळ्या पाणी अर्पण करा. उत्सवमूर्तीच्या हातांवर एका फुलाने थोडे पाणी शिंपडा.)

**श्रीसिद्धिविनायकाय नमः । हस्तयोः अर्घ्यं समर्पयामः ।**

श्रीसिद्धीविनायकाला नमस्कार असो. हात धुण्यासाठी हे पाणी समर्पित करतो.

(सुपारीरूपी गणेश अथवा धातूच्या मूर्तीवर दोन पळ्या पाणी अर्पण करा. उत्सवमूर्तीच्या मुखापाशी एका फुलाने थोडे पाणी शिंपडा.)

**श्रीसिद्धिविनायकाय नमः । आचमनीयं समर्पयामः ।**

श्रीसिद्धीविनायकाला नमस्कार असो. आचमन करण्यासाठी हे पाणी समर्पित करतो.

(सुपारीरूपी गणेश अथवा धातूच्या मूर्तीवर चार-पाच पळ्या पाणी अर्पण करा. उत्सवमूर्तीच्या मस्तकावर एका फुलाने थोडे पाणी शिंपडा.)

**श्रीसिद्धिविनायकाय नमः। स्नानीयं समर्पयामः ।**

श्रीसिद्धीविनायकाला नमस्कार असो.स्नानासाठी हे पाणी समर्पित करतो.

(सुपारीरूपी गणेश अथवा धातूच्या मूर्तीवर चार-पाच पळ्या पंचामृत अर्पण करा. उत्सवमूर्तीवर एका फुलाने थोडे पंचामृत शिंपडा.)

**श्रीसिद्धिविनायकाय नमः। पञ्चामृतस्नानं समर्पयामः।** (पञ्चामृतस्स्नानं)

श्रीसिद्धीविनायकाला नमस्कार असो. पंचामृताने स्नान अर्पण करतो.

(सुपारीरूपी गणेश अथवा धातूच्या मूर्तीवर चार-पाच पळ्या गरम पाणी अर्पण करा. उत्सवमूर्तीच्या मस्तकावर एका फुलाने थोडे पाणी शिंपडा.)

**श्रीसिद्धिविनायकाय नमः । उष्णोदकस्नानं समर्पयामः ।** (उष्णोदकस्स्नानं)

श्रीसिद्धिविनायकाला नमस्कार असो. गरम पाणी समर्पित करतो.

(सुपारीरूपी गणेश अथवा धातूच्या मूर्तीवर पळीने थोडे पाणी अर्पण करा. उत्सवमूर्तीच्या मस्तकावर एका फुलाने थोडे पाणी शिंपडा आणि म्हणा-)

**श्रीसिद्धिविनायकाय नमः । अभिषेकस्नानं समर्पयामः।** (अभिषेकस्स्नानं)

श्रीसिद्धिविनायकाला नमस्कार असो. अथर्वशीर्ष पठण करताना हा अभिषेक करूया.

(अथर्वशीर्षात ज्या व्यंजनावर आघात देऊन उच्चार करावयाचा असतो. त्या व्यंजनाखाली एक बारीकशी रेघ मारली आहे. त्या व्यंजनाचा उच्चार द्वित्वासारखा करावा.)

*(प्रस्तुत पोथीत शेवटी समश्लोकी मराठी अथर्वशीर्ष दिले आहे. ते आवर्जून पहावे.)*

## श्रीगणपति-अथर्वशीर्ष (सार्थ)

**ॐ नमस्ते गणपतये । त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि । त्वमेव केवलं कर्तासि । त्वमेव केवलं धर्तासि ।त्वमेव केवलं हर्तासि । त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि । त्वं साक्षादात्मासि नित्यम् ।।१।।** (त्वमेवप्प्रत्यक्षं)

गणांचा नायक असलेल्या हे गणपते, तुला नमस्कार असो. तूच प्रत्यक्ष आदितत्त्व आहेस. तूच केवळ (सर्व जगाचा) निर्माता आहेस. तूच केवळ संहार करणारा आहेस. तूच खरोखर हे सर्व ब्रह्म आहेस. तू प्रत्यक्ष शाश्वत आत्मतत्त्व आहेस. ।।१।।

**ऋतं वच्मि । सत्यं वच्मि ।।२।।**

मी ऋत आणि सत्य (या परमात्म्याच्या दोन्ही अंगांना अनुलक्षून वरील सर्व) म्हणत आहे. ।।२।।

**अव त्वं माम् । अव वक्तारम् । अव श्रोतारम् । अव दातारम् । अव धातारम् । अवानूचानमवशिष्यम् । अव पश्चात्तात् । अव पुरस्तात् ।**

**अवोत्तरात्तात्। अव दक्षिणात्तात्। अव चोर्ध्वात्तात्। अव अधरात्तात्।**
**सर्वतो मां पाहि पाहि समन्तात् ।।३।।** (अवश्‌श्रोतारम् ।)

तू माझे रक्षण कर. वक्त्याचे (तुझे गुण वर्णन करणाऱ्याचे) रक्षण कर. श्रोत्यांचे रक्षण कर. (शिष्यास उपासना) देणाऱ्या (गुरूचे) रक्षण कर. ज्ञानदात्या (गुरूचे) रक्षण कर. शिष्याचे रक्षण कर. मागच्या बाजूने रक्षण कर. समोरून रक्षण कर. डावीकडून रक्षण कर. उजवीकडून रक्षण कर. ऊर्ध्व दिशेकडून रक्षण कर. अधर दिशेकडून रक्षण कर. सर्व ठिकाणी सर्व बाजूंनी माझे रक्षण कर. रक्षण कर. ।।३।।

**त्वं वाङ्‌मयस्त्वं चिन्मयः। त्वंआनंदमयस्त्वं ब्रह्ममयः।**
**त्वं सच्चिदानंदाद्वितीयोऽसि। त्वं प्रत्यक्षं ब्रह्मासि।**
**त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि ।।४।।**

तू शब्दब्रह्म आहेस. तू चैतन्यमय आहेस. तू आनंदरूप आहेस. ज्याहून दुसरे काहीच तत्त्व नाही असे सत् चित् व आनंद (या रूपांनी प्रतीत होणारे) एकच तत्त्व तू आहेस. तू प्रत्यक्ष ब्रह्म आहेस. तू (नाना प्रकारे नटलेल्या विश्वाचे) ज्ञान आहेस. तू (सर्वसाक्षीभूत एकत्वाचे) विशिष्ट असे ज्ञान आहेस. ।।४।।

**सर्वं जगदिदं त्वत्तो जायते। सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति ।**
**सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति। सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति ।**
**त्वं भूमिरापोऽनलोऽनिलो नभः। त्वं चत्वारि वाक् पदानि।।५।।**
(त्वयिप्प्रत्येति ।)

हे सर्व जग तुझ्यापासून उत्पन्न होते. हे सर्व जग तुझ्यामुळे स्थिर राहते. हे सर्व जग तुझ्या ठिकाणी लय पावणार आहे. हे सर्व जग तुझ्या ठिकाणीच परत येऊन मिळते. तू पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश आहेस. तू (परा, पश्यन्ती, मध्यमा, वैखरी ही) वाणीची चार रूपे आहेस. ।।५।।

**त्वं गुणत्रयातीतः। त्वं देहत्रयातीतः। त्वं कालत्रयातीतः।**
**त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यम्। त्वं शक्तित्रयात्मकः।**
**त्वां योगिनो ध्यायन्ति नित्यम्। त्वं ब्रह्मा, त्वं विष्णुः, त्वं रुद्रः, त्वम् इन्द्रः,**
**त्वम् अग्निः, त्वं वायुः, त्वं सूर्यः, त्वं चन्द्रमाः, त्वं ब्रह्मभूर्भुवः स्वरोम् ।।६।।**
(गुणत्त्रयातीतः) (शक्तित्त्रयात्मकः) (ब्रह्मभूर्भुवस्स्वरोम्)

तू (सत्त्व, रज, तम) या त्रिगुणांच्या पलीकडे आहेस. तू (स्थूलदेह, सूक्ष्मदेह व कारणदेह) या देहत्रयांच्या पलीकडचा आहेस. तू (भूत, वर्तमान व भविष्य) या तिन्ही काळांच्या पलीकडचा आहेस. तू (इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती) या तिन्ही शक्तींचा आत्मा आहेस. योगी तुझे नित्य ध्यान करतात. तू ब्रह्मदेव, तूच विष्णू, तूच इंद्र, तूच अग्नी, तूच वायू,तूच सूर्य, तूच चंद्र, तूच ब्रह्म, तूच भूः, तूच भुवः, तूच स्वः व तूच ॐ कार आहेस. ।।६।।

**गणादिं पूर्वमुच्चार्य वर्णादिं तदनन्तरम्। अनुस्वारःपरतरः। अर्धेन्दुलसितम्। तारेण रुद्धम्। एतत् तवमनुस्वरूपम्। गकारः् पूर्वरूपम्। अकारो मध्यमरूपम्। अनुस्वारश्चान्त्यरूपम् । बिन्दुरुत्तररूपम् । नादस्सन्धानम् । संहिता सन्धिः। सैषा गणेशविद्या। गणकऋषिः। निचृद्गायत्रीछन्दः। गणपतिर्देवता। ॐ गं गणपतये नमः ।।७।।**

गण शब्दाचा आदिवर्ण ग याचा प्रथम उच्चार करून वर्णातील प्रथमवर्ण अ याचा उच्चार करावा. त्यानंतर अर्धचन्द्राकार शोभणाऱ्या अनुस्वाराचा उच्चार करणे, हे तुझ्या बीजमंत्राचे रूप होय. या बीजमंत्रात गकार हे पूर्वरूप, अकार मध्यरूप, अनुस्वार अन्त्यरूप व बिंदू उत्तररूप होय. या सर्वांचे एकीकरण करणारा नादयुक्त बीजमंत्र सिद्ध होणे हीच ती गणेशविद्या. या मंत्राचा गणक हा ऋषी आहे. या मंत्राचा निचृद गायत्री हा छंद आहे. गणपती ही देवता आहे. बीजमंत्रस्वरूप अशा या गणपतीला वंदन असो. ।।७।।

**एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि। तन्नो दन्ती प्रचोदयात् ।।८।।**

आम्ही एकदन्ताला जाणतो. आम्ही वक्रतुंडाचे ध्यान करतो. त्यासाठी एकदन्त आम्हास प्रेरणा देवो. ।।८।।

**एकदन्तं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम्। रदं च वरदं हस्तैः,**
**बिभ्राणं मूषकध्वजम्। रक्तं लम्बोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम्।**
**रक्तगन्धानुलिप्ताङ्गं, रक्तपुष्पैः सुपूजितम्। भक्तानुकम्पिनं देवं**
**जगत्कारणमच्युतम् । आविर्भूतं च सृष्टयादौ प्रकृतेः पुरुषात् परम्।**
**एवं ध्यायति यो नित्यम्, स योगी योगिनां वरः ।।९ ।।** (रक्तपुष्पैस्सुपूजितम्)

एक दात असलेला, चार हात असलेला (उजव्या बाजूच्या वरच्या हातापासून

प्रदक्षिणा क्रमाने त्याच बाजूच्या खालच्या हातापर्यंत) क्रमश: पाश, अंकुश, दात व वरदमुद्रा धारण करणारा, मूषक ही ज्याची खूण आहे असा तांबड्या रंगाचा, लांबट उदर असलेला, सुपासारखे कान असलेला, रक्तवस्त्र धारण करणारा, तांबड्या (रक्तचंदनाच्या) गंधाने विलेपित आहे असा, तांबड्या फुलांनी ज्याचे उत्तम पूजन केले आहे असा, भक्तांवर दया करणारा, सर्व जगाचे कारण असणारा, अविनाशी, सृष्टीच्या आधीच प्रकट झालेला, प्रकृतिपुरुषापलीकडचा देव, असे जो नित्य ध्यान करतो तो योगी, सर्व योग्यांमध्ये श्रेष्ठ होय. ।।९।।

**नमो व्रातपतये । नमो गणपतये । नमः प्रमथपतये । नमस्ते अस्तु लम्बोदराय एकदन्ताय विघ्ननाशिने। शिवसुताय श्रीवरदमूर्तये नमः ।।१०।।**
(नमःप्प्रमथपतये ।)

ज्यांच्यावर संस्कार झालेले नाहीत अशांच्या संघाचे अधिपतीस नमस्कार असो. गणांच्या नायकास नमस्कार असो. प्रमथांच्या अधिपतीस नमस्कार असो. लंबोदर, एकदन्त, विघ्ननाशी, शिवसुत, श्रीवरदमूर्ती अशा, तुला नमस्कार असो. ।।१०।।

## फलश्रुती

कोणत्याही स्तोत्राच्या पठणामुळे उपासकाला त्याचे काय फळ मिळते यासंबंधीचा आशय फलश्रुतीमध्ये असतो. आपल्या प्रयत्नांवर व कर्तृत्वावर विश्वास ठेवून उपासकाने कार्य करावे. सुयोग्य प्रयत्नांना प्रार्थनेची जोड दिल्यास दैव म्हणजे आपल्या नियंत्रणात नसलेले घटक अनुकूल होतील असा आशावाद बाळगायला हरकत नाही.

**एतदथर्वशीर्षं योऽधीते । स ब्रह्मभूयाय कल्पते । स सर्वविघ्नैर्न बाध्यते। स सर्वतसुंखमेधते । स पञ्चमहापापात् प्रमुच्यते। सायमधीयानो दिवसकृतं पापं नाशयति। प्रातरधीयानो रात्रिकृतं पापं नाशयति । सायंप्रातः प्रयुञ्जानो अपापो भवति। सर्वत्राधीयानो अपविघ्नो भवति। धर्मार्थकाममोक्षं च विन्दति । इदम् अथर्वशीर्षम् अशिष्याय न देयम् । यो यदि मोहात् दास्यति स पापीयान् भवति । सहस्त्रावर्तनात् यं यं काममधीते तं तमनेन साधयेत् ।।११।।** (प्रात:प्प्रयुञ्जानो )

या अथर्वशीर्षाचे जो अध्ययन करतो तो ब्रह्मरूप होतो. त्याला कोणत्याच

विघ्नांची बाधा होत नाही. तो सर्व बाजूंनी सुखात वाढतो. (हिंसा, अभक्ष्यभक्षण, परदारागमन, चौर्य व पापसंसर्ग) या पाचही महापापांपासून मुक्त होतो. संध्याकाळी पठण करणाऱ्याच्या दिवसा (अजाणपणे) केलेल्या पापांचा नाश होतो. सकाळी पठण करणाऱ्याच्या रात्री (नकळत) केलेल्या पापांचा नाश होतो. संध्याकाळी व सकाळी पठण करणारा पाप (प्रवृत्ती) रहित होतो. सर्व ठिकाणी (याचे) अध्ययन करणारा विघ्नमुक्त होतो. धर्म, अर्थ, काम व मोक्ष मिळवतो. हे अथर्वशीर्ष (अनधिकारी) शिष्यभाव नसलेल्या माणसाला सांगू नये. जर कोणी अशा अनधिकाऱ्यास मोहाने देईल तर तो मोठाच पापी होईल. या अथर्वशीर्षाच्या सहस्त्र आवर्तनांनी जी जी कामना मनुष्य करील ती ती सिद्ध होईल. ।।११।।

**अनेन गणपतिमभिषिञ्चति स वाग्मी भवति ।**
**चतुर्थ्यामनश्नन् जपति स विद्यावान् भवति । इति अथर्वण वाक्यम् ।**
**ब्रह्माद्याचरणं विद्यात् । न बिभेति कदाचनेति ।।१२।।**

या अथर्वशीर्षाने जो गणपतीला अभिषेक करतो तो उत्तम वक्ता होतो. चतुर्थीच्या दिवशी काही न खाता जो याचा जप करतो तो विद्यासंपन्न होतो असे अथर्वण ऋषीचे वाक्य आहे. (याचा जप करणाऱ्याला) ब्रह्म व आद्या (म्हणजेच माया) यांचा विलास कळेल. तो कधीच भीत नाही. ।।१२।।

**यो दूर्वाङ्कुरैर्यजति स वैश्रवणोपमो भवति ।**
**यो लाजैर्यजति स यशोवान् भवति। स मेधावान् भवति ।**
**यो मोदकसहस्त्रेण यजति स वाञ्छितफलमवाप्नोति ।**
**यः साज्यसमिद्भिर्यजति स सर्वं लभते स सर्वं लभते ।।१३।।**

(यस्साज्यसमिद्भिर्यजति)

जो दूर्वांकुरांनी हवन करतो तो कुबेरासम होतो. जो साळीच्या लाह्यांनी हवन करतो तो यशस्वी, सर्वंकष बुद्धिमान होतो. जो सहस्त्र मोदकांनी हवन करतो तो हवी असलेली गोष्ट मिळवतो. जो तूप व समिधांनी हवन करतो तो सर्व म्हणजे अगदी सर्व काही मिळवतो.

**अष्टौ ब्राह्मणान् सम्यग् ग्राहयित्वा सूर्यवर्चस्वी भवति ।**
**सूर्यग्रहे महानद्यां प्रतिमासन्निधौ वा जप्त्वा सिद्धमन्त्रो भवति ।**

**महाविघ्नात् प्रमुच्यते । महादोषात् प्रमुच्यते । महापापात् प्रमुच्यते ।**
**स सर्वविद् भवति स सर्वविद् भवति । य एवं वेद। इत्युपनिषद् ।।१४।।**

आठ ब्राह्मणांना योग्य प्रकारे (याचा) उपदेश केल्यास, करणारा सूर्यासारखा तेजस्वी होतो. सूर्यग्रहणात महानदीतीरी किंवा गणपतीच्या प्रतिमेसन्निध जप केल्यास हा मंत्र सिद्ध होतो. (असा मंत्र सिद्ध करणारा) महाविघ्नांपासून, महादोषांपासून व महापापांसून मुक्त होतो. तो सर्वज्ञ होतो. जो हे जाणतो, तो सर्वसंपन्न होतो असे हे उपनिषद् आहे. ।।१४।।

(सुपारीरूपी गणेश किंवा धातूची छोटी मूर्ती स्वच्छ पुसून, कोरडी करून उत्सवमूर्तीच्या पुढे छोट्या वाटीत पुन्हा ठेवून द्यावी. खालील उपचार दोन्ही गणपतींना सामाईक पद्धतीने करायचे आहेत.)

## षोडशोपचार पूजा

(दोन्ही गणपतींना कापसाचे वस्त्र अर्पण करा. उपलब्ध असल्यास रेशमी उपरणे महावस्त्र म्हणून उत्सवमूर्तीला अर्पण करा.)

**श्रीसिद्धिविनायकाय नमः । वस्त्रं समर्पयामः ।**

श्रीसिद्धिविनायकाला नमस्कार असो. अभिषेकानंतर हे वस्त्र अर्पण करतो.

(उत्सवमूर्तीच्या डाव्या खांद्यावरून कमरेच्या उजव्या बाजूला येईल अशा पद्धतीने जानवे अर्पण करा व सुपारीरूपी गणेश/ छोट्या मूर्तीला गोलाकार यज्ञोपवीत अर्पण करा.)

**श्रीसिद्धिविनायकाय नमः । यज्ञोपवीतं समर्पयामः ।**

श्रीसिद्धिविनायकाला नमस्कार असो. आता हे यज्ञोपवीत अर्पण करतो.

(चंदन तसेच उपलब्ध असल्यास गुलाल, बुक्का, अत्तर इ. अर्पण करताना म्हणा –)

**श्रीसिद्धिविनायकाय नमः। विलेपनार्थे चन्दनं समर्पयामः।**

श्रीसिद्धिविनायकाला नमस्कार असो. अंगाला लावण्यासाठी हे चंदन अर्पण करतो.

(उपलब्ध फुले, पाने, हार इ. अर्पण करताना म्हणा -)

**श्रीसिद्धिविनायकाय नमः। पूजार्थे पुष्पाणि, पत्राणि,**
**दूर्वाङ्कुराणि च समर्पयामः।**

श्रीसिद्धिविनायकाला नमस्कार असो. पूजनासाठी ही फुले, पत्री आणि दूर्वा अर्पण करतो.

(उदबत्तीने ओवाळताना म्हणा-)

**श्रीसिद्धिविनायकाय नमः । सुवासार्थे धूपं आघ्रापयामः ।**

श्रीसिद्धिविनायकाला नमस्कार असो. सुगंधासाठी धूप अर्पण करतो.

(निरांजनाने ओवाळताना म्हणा- )

**श्रीसिद्धिविनायकाय नमः । प्रकाशार्थे दीपं दर्शयामः ।**

श्रीसिद्धिविनायकाला नमस्कार असो. प्रकाशासाठी हा दीप दाखवतो.

(जमिनीवर पाण्याचा भरीव चौकोन काढावा व त्यावर उपलब्ध नैवैद्य आणि शिल्लक असलेले पंचामृत ठेवावे. सर्व पदार्थांभोवती तीन वेळा प्रदक्षिणाक्रमाने गोलाकार पाणी फिरवावे आणि म्हणावे -)

**श्रीसिद्धिविनायकाय नमः । नैवेद्यं समर्पयामः ।**

श्रीसिद्धिविनायकाला नमस्कार असो.देवतेच्या पंचप्राणांना नैवेद्य समर्पित करतो.

**ॐ प्राणाय स्वाहा । अपानाय स्वाहा । व्यानाय स्वाहा** (प्राणायस्स्वाहा)
**उदानाय स्वाहा । समानाय स्वाहा । ब्रह्मणे स्वाहा ।।**

(परमेश्वरचरणी नैवेद्य अर्पण केल्यानंतर आता आपण प्रार्थना करूया. माझ्या पाठोपाठ आपण सर्वांनी म्हणावे.)

## गद्य प्रार्थना

राष्ट्रार्थ भव्य कृति काही पराक्रमाची ! ईर्ष्या निजांतरि धरूनि करावयाची !! खरोखर देशाच्या हितासाठी / आणि उन्नतीसाठी /आम्हा सर्वांच्या हातून / सामूहिक रीत्या काही मोठे कार्य घडावे / अशी तळमळ मनात धरून /आम्ही एकत्र जमत आहोत / हे विघ्नहर्त्या श्रीगणेशा ! / आमच्या संकल्पाला / तुझे शुभाशीर्वाद

असू देत / हे गणराया ! / तू संघटनेची देवता आहेस / तुला स्मरून आम्ही संकल्प करतो की /आम्ही सर्वजण एकदिलाने राहू / हाती घेतलेले कार्य सिद्धीस नेण्याचा / सर्व शक्तीनिशी प्रयत्न करू / व्यक्तीपेक्षा कार्य मोठे असते / हा मंत्र आम्ही सदैव लक्षात ठेवू / आणि त्यानुसार कार्याच्या हितासाठी /वैयक्तिक स्वार्थाला तिलांजली देऊ/ हे बुद्धिदायका ! / तू सर्व विद्या आणि कलांचा /अधिष्ठाता आहेस / आमच्या देशात/ जीवनाच्या सर्व क्षेत्रांत / सदैव नवीन संशोधन व्हावे /ते ज्ञान समाजाच्या कारणी लागावे / आणि त्यातून सर्व समाजाचे जीवन / संपन्न आणि समृद्ध बनावे /अशा प्रकारे प्रयत्न करण्याची बुद्धी / तू आम्हा सर्वांना दे/ हे परमेशा ! / तुझ्या पावित्र्याची विटंबना आमच्या हातून कधीही न घडो / विद्येचे व्यसन आणि सत्कार्याचे व्यसन / ही दोनच व्यसने / आमच्या मनात असोत / अन्य सर्व व्यसनांपासून / आम्हाला मुक्त कर / आणि अशा प्रकारे हा समाज / सद्‌गुण संपन्नतेकडे वाटचाल करो !

## श्रीगणपतीची आरती

**श्रीसिद्धिविनायकाय नमः । महानीराञ्जनदीपं समर्पयामः ।**

(श्रीसिद्धिविनायकाला नीरांजनाने आरती ओवाळूया आणि मंत्रपुष्पांजली अर्पण करूया. सर्वांनी उभे राहावे. येथे सर्वांनी एका सुरात, सौम्य आवाजात, शक्य तर वाद्याच्या तालावर आरती म्हणावी.)

**सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची**
**नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।।**
**सर्वांगी सुंदर उटी शेंदूराची ।**
**कंठी झळके माळ मुक्ताफळांची ।**
**जय देव जय देव जय मंगलमूर्ती**
**दर्शनमात्रे मनकामना पूर्ती ।।ध्रु. ।।**
**रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा**
**चंदनाची उटी कुंकुमकेशरा ।।**
**हिरेजडित मुगुट शोभतो बरा ।**

**रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया ।।जय. ।।**
**लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।**
**सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।।**
**दास रामाचा वाट पाहे सदना ।**
**संकटी पावावे, निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना ।।जय..।।**

## मंत्रपुष्पांजली

सार्वभौम, दीर्घायुषी राजा आणि त्याची संपन्न समृद्ध, आनंदी प्रजा यांच्या कल्याणाची ही प्रार्थना आहे. देशाच्या ऐक्यासाठी या मंत्रपुष्पाने श्रीगणेशाला आवाहन करूया आणि हा देश प्रगतिपथावर राहावा यासाठी प्रार्थना करूया.

**ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवाः/तानि धर्माणि(प्) प्रथमान्यासन्/ते ह नाकं महिमान(स्)सचन्त। यत्र पूर्वे साध्यास्सन्ति देवाः/ॐ राजाधिराजाय (प्) प्रसह्यसाहिने/नमो वयं वैश्रवणाय कुर्महे/स मे कामान् कामकामाय मह्यम् / कामेश्वरो वैश्रवणो ददातु/कुबेराय, वैश्रवणाय/महाराजाय नमः/ॐ स्वस्ति साम्राज्यं, भौज्यं/स्वाराज्यं, वैराज्यं, पारमेष्ठ्यं राज्यं/माहाराज्यमाधिपत्यमयं/ समन्तपर्यायि स्यात्/सार्वभौम(स्)सार्वायुष आन्तादापरार्धात्/पृथिव्यै समुद्रपर्यन्तायाः/एकराळिति/तदप्येष(श्)श्लोकोऽभिगीतो मरूतः(प्)परिवेष्टारो/ मरूत्तस्यावसन् गृहे / आविक्षितस्य कामप्रेः/विश्वेदेवा(स्)सभासद इति।।**
(ऋ.१.१६४.५०, ऐतरेय ब्राह्मण ८.१३.१)

## अन्वय व अर्थ

**(देवाः)** देवांनी **(यज्ञेन)** यज्ञाने **(यज्ञं)** यज्ञाची **(अयजन्त)** पूजा केली. **(तानि)** तोच त्या वेळी **(प्रथमानि)** प्रमुख **(धर्माणि)** धर्म **(आसन्)** मानला जात असे. **(ते)** ते **(देवाः)** देव **(महिमानः)** श्रेष्ठत्व प्राप्त करून **(यत्र)** जेथे **(पूर्वे साध्याः)** श्रेष्ठ देवगण **(सन्ति)** वास्तव्य करीत असत अशा **(नाकं)** स्वर्गाला **(सचन्त)** जाऊन पोहोचले. **(वयं)** आम्ही **(प्रसह्यसाहिने)** सामर्थ्यवान, **(राजधिराजाय)** राजाधिराज, **(वैश्रवणाय)** विश्रवसपुत्र कुबेराला **(नमः कुर्महे)** नमस्कार करतो. **(कामेश्वरः)** सर्व इच्छांचा स्वामी असा **(सः)** तो **(वैश्रवणः)** विश्रवसपुत्र कुबेर **(कामकामाय)** अनेक इच्छा असणाऱ्या

**(मह्यं)** माझ्या **(कामान् ददातु)** इच्छा पूर्ण करो. **(वैश्रवणाय)** विश्रवसपुत्र **(महाराजाय)** महाराज **(कुबेराय)** कुबेराला **(नमः)** नमस्कार असो. **(ॐ स्वस्ति)** सर्वांचे कल्याण असो **(अयं)** हा **(सार्वभौमः)** सार्वभौम, **(सार्वायुषः)** दीर्घायुषी राजा आणि त्याचे **(साम्राज्यं)** साम्राज्य **(भौज्यं)** उपभोगाच्या वस्तूंनी संपन्न, **(स्वाराज्यं)** प्रजातंत्राने चालणारे, **(वैराज्यं)** सर्वथा स्वतंत्र, **(पारमेष्ठ्यं राज्यं)** परमेश्वराशी निष्ठावंत, **(माहाराज्यं)** विस्तृत, **(आधिपत्यं)** अनेक अधिकारी असलेले आणि **(समन्तपर्यायी)** सर्वसमावेशक असे असो. **(आ अंतात्)** जगाच्या अंतापर्यंत, **(आ परार्धात्)** परार्धकालापर्यंत **(सः)** तो राजा **(समुद्रपर्यन्तायै)** समुद्रवलयांकित **(पृथिव्यै)** पृथ्वीचा **(एकराट् इति)** एकछत्री सम्राट होवो.

**(तदपि)** नंतर **(एषः)** हादेखील **(श्लोकः)** श्लोक **(अभिगीतः)** म्हटलेला आहे. **(विश्वे देवाः)** सर्व देव व **(परिवेष्टारः मरुतः)** सभोवार बसलेले इतर मरुत हे **(कामप्रेः)** कामना पूर्ण करणाऱ्या **(आविक्षितस्य)** अविक्षितकुलोत्पन्न **(मरुतस्य गृहे)** मरुताच्या घरी **(सभासदः इति)** पाहुणे म्हणून **(अवसन्)** राहिले होते.

## श्री गणेशाची उत्तरपूजा

(ऋषिपंचमीला, गौरीविसर्जनाचे दिवशी, अनंतचतुर्दशीला किंवा अन्य सुयोग्य दिवशी गणेशविसर्जन करावे.त्या आधी खालीलप्रमाणे उत्तरपूजा करावी.)

**हरिः ॐ, ॐ, ॐ**

(आचमनासाठी आपल्या उजव्या हाताची गोकर्ण मुद्रा करा. डाव्या हाताने पळीभर पाणी उजव्या हाताच्या गोकर्ण मुद्रेत घ्या आणि प्या. पाणी पिऊन झाल्यावर म्हणा) –

**ॐ केशवाय नमः ।** केशवाला नमस्कार असो.

(पुन्हा एकदा गोकर्ण मुद्रेत एक पळी पाणी घ्या, प्या आणि म्हणा) –

**ॐ नारायणाय नमः।** नारायणाला नमस्कार असो.

(पुन्हा एकदा एक पळी पाणी गोकर्ण मुद्रेत घेऊन प्या आणि म्हणा ) –

**ॐ माधवाय नमः ।** माधवाला नमस्कार असो.

(आता चौथ्या वेळी एक पळी पाणी गोकर्ण मुद्रेत घ्या आणि उजव्या हाताच्या मधल्या बोटावरून ते पाणी ताम्हनात सोडा आणि म्हणा)

**ॐ गोविन्दाय नमः।** गोविंदाला नमस्कार असो.

(उजव्या हातात पळीभर पाणी घेऊन म्हणावे)-

**श्रीसिद्धिविनायक-महागणपतिप्रीत्यर्थं गन्धादिपञ्चोपचारैः उत्तरपूजनं करिष्यामहे।** (पाणी मधल्या बोटावरून ताम्हनात सोडावे.)

श्री सिद्धिविनायकाने प्रसन्न व्हावे यासाठी गंध, पुष्प, इ. पंचोपचारांनी पूजा करतो.

(पूजेपूर्वी देवतेला वाहिलेली आधीची फुले, हार इ. काढून घ्यावे.)

(चंदन लावताना म्हणा )-

**श्रीसिद्धिविनायकाय नमः। विलेपनार्थे चन्दनं समर्पयामः ।**

श्रीसिद्धिविनायकाला नमस्कार असो. अंगाला लावण्यासाठी हे चंदन अर्पण करतो.

(फुले, हार,दूर्वा अर्पण करताना म्हणा) -

**श्रीसिद्धिविनायकाय नमः। पूजार्थे पुष्पाणि,पत्राणि, दूर्वाङ्कुराणि च समर्पयामः ।**

श्रीसिद्धिविनायकाला नमस्कार असो. पूजनाला ही फुले, पत्री आणि दूर्वा अर्पण करतो.

(उदबत्ती ओवाळताना म्हणा-)

**श्रीसिद्धिविनायकाय नमः । सुवासार्थे धूपं आघ्रापयामः ।**

श्रीसिद्धिविनायकाला नमस्कार असो. सुगंधासाठी धूप अर्पण करतो.

(निरांजन ओवाळताना म्हणा )-

**श्रीसिद्धिविनायकाय नमः । प्रकाशार्थे दीपं दर्शयामः ।**

श्रीसिद्धिविनायकाला नमस्कार असो. प्रकाशासाठी हा दीप दाखवतो.

(नैवेद्य दाखवताना म्हणा )-

**श्रीसिद्धिविनायकाय नमः । नैवेद्यं समर्पयामः ।**

**ॐ प्राणाय स्वाहा । अपानाय स्वाहा । व्यानाय स्वाहा।**

**उदानाय स्वाहा । समानाय स्वाहा । ब्रह्मणे स्वाहा ।**

(प्राणायस्स्वाहा)
श्री गणेशाच्या पंचप्राणांना हा नैवेद्य अर्पण करतो.
(आता आपण श्रीगणरायाला निरोप देण्यापूर्वी त्याची प्रार्थना करू.)

## प्रार्थना

भारत देश विजयी व्हावा म्हणून / आम्हा सर्वांनाच तू / सत्कार्याची, सदाचाराची आणि सहकार्याची / दृढ प्रेरणा दे / हे गणराया / तुझा उत्सव साजरा करण्यात / यंदा आम्ही जर कोठे / कमी पडलो असू / तर त्यासाठी तू क्षमा करावीस/ पुढील वर्षी अधिक उत्साहाने / व याहीपेक्षा आनंदाने / हा उत्सव साजरा करण्याची / बुद्धी, शक्ती आणि उत्साह / तू आम्हाला दे/ पुढील वर्षी या उत्सवात / अधिक मंगलमय वातावरण राहील / श्रेष्ठ अभिरुचीचे कार्यक्रम होतील/ याची आम्ही दक्षता घेऊ / आम्ही सर्वजण परपस्परांना साथ देणारे / एकमेकांवर उदंड स्नेह करणारे बनू / पुढील वर्षी गणेशोत्सवाच्या निमित्ताने / भारतीय संस्कृती, धर्म आणि अध्यात्म/ यांची योग्य माहिती समाजाला होईल / अशा कार्यक्रमांची योजना करू / आणि वर्षभर / विविध सामजिक कामांमध्ये / भाग घेत जाऊ / आमच्यापैकी ज्यांना वाईट सवयी असतील / त्यांच्या त्या वाईट सवयी दूर करण्याचा/ आमचा संघटित प्रयत्न राहील/ गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत / मंगलमूर्तीचे मांगल्य ज्याने कमी होईल / असे कोणतेच कृत्य / आमच्यापैकी कोणीच करणार नाही / आजूबाजूचा समाज व राष्ट्र यामध्ये / चारित्र्यसंपन्न माणसांची संख्या वाढावी / असा आम्ही प्रयत्न करू / हे गणनायका / यासाठी तू सर्वांना सद्‌बुद्धी दे.

(यानंतर सर्वांनी आरती करून मंत्रपुष्पांजली म्हणावी व श्रीगणेशाच्या हातावर दहीपोहे किंवा मोदकाची शिदोरी ठेवावी.)

## विसर्जन

(श्रीगणेशाची उत्सवमूर्ती व सुपारीरूपी गणेशावर अक्षता प्रोक्षण कराव्यात.)

**यान्तु देवगणाः सर्वे, पूजामादाय पार्थिवीम् ।** (देवगणास्सर्वे)
**इष्टकामप्रसिद्‌ध्यर्थं, पुनरागमनाय च ।।** (इष्टकामप्प्रसिद्‌ध्यर्थं)

(या नंतर मूर्ती जागेवरच थोडी हलवून ठेवावी.) सर्व अनुचरांसह प्रस्तुत पूजेचा स्वीकार करून श्रीमहागणपतीने स्वस्थानी गमन करावे. पण आमच्या मनोकामनांची पूर्ती करण्यासाठी पुनश्च लवकर यावे.

**ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु ।** हे सर्वच परब्रह्माला अर्पण असो.

(विसर्जनासाठी मृण्मय उत्सवमूर्ती व सुपारीरूपी गणेश दोन्ही न्यावयाचे आहे. धातूची छोटी गणेशमूर्ती मात्र रोजच्या देवपूजेत नेऊन ठेवायची आहे.)

(उत्तरपूजा करून त्यानंतर घंटानाद करीत, श्री गणेशाचा जयजयकार करीत मूर्तीचे विसर्जन करण्यास जावे. आजकाल जलाशयांचे पाणी, नद्यांचे पाणी हे खूपच प्रदूषित असते. विसर्जनस्थानी गलिच्छता असते. गटारांचे पाणी त्यात येऊन मिळत असते. त्यासाठी शाडूच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून तिचे विसर्जन घरातच अथवा नदीच्या काठी बादलीत करावे. एक दोन दिवसात झाकण उघडून पाहिल्यास तळात केवळ शाडू साठलेला दिसतो. तो तुळशीत वा अन्य झाडाच्या मुळाशी घालावा. निर्माल्यही शक्यतो तुळशीत पुरावे. काही पर्यावरणप्रेमी संस्था गणेशमूर्तींच्या संकलनाचे कार्य विसर्जनस्थळी करीत असतात त्यांनाही सहकार्य करावे. त्यामुळे प्रदूषण कमी होईल व आपल्या भावनांना धक्का लागणार नाही.)

## ।। गणपतीबाप्पा मोरया ।।

## गणेशपत्री

१) **मधुमालती (मालती) –** ह्याची पाने त्वचारोगावर गुणकारी असतात.

२) **माका (भृंगराज) –** बुद्धिवर्धक, यकृतांच्या विकारांवर व लहान मुलांना होणाऱ्या कफावर उत्तम औषध, याचे तेल केसाच्या विकारावर उपयोगी.

३) **बेल (बिल्बपत्र) –** अतिसार, विशेषत: लहान मुलांना होणाऱ्या आजारावरील औषध.

४) **बोर (बदरी) –** शरीराच्या कोणत्याही भागात आग होत असल्यास पाला वाटून लावावा.

५) **धोत्रा –** पाला गरम करून बांधल्याने सूज कमी होते.

६) **तुळस –** कफ विकारावरील महत्त्वाचे औषध.

७) **शमी –** जुलाब, रक्तपित्त इ. विकारांवरील उत्तम औषध.
८) **आघाडा (अपामार्ग) –** मूत्र साफ करणारे हे औषध आहे.
९) **बृहती –** डोरली हे प्रचलित नाव. खोकला, कंठरोग कमी करणारे श्रेष्ठ औषध.
१०) **कण्हेर (करवीर)** – याच्या मुळाचा लेप मुळव्याधीतील आग, ठणका थांबवतो.
११) **रुई (अर्क)–** हत्तीरोग, वेगवेगळ्या प्रकारची सूज, त्वचा विकार यावर उपयुक्त.
१२) **ऐन (अर्जुन सादडा)–** हृदयाची ताकद वाढवते.
१३) **शंखपुष्पी (विष्णुक्रांता)–** उत्तम आकलन शक्ती वाढविणारे आहे.
१४) **डाळिंब –** साल, अतिसार, संग्रहणी यावर उपयोगी पडते. कृमीनाशक आहे.
१५) **देवदार –** सांधे दुखणे, सुजणे, सर्दी, ताप इ. विकारांवरील उत्तम औषध.
१६) **मरवा –** कृमी, त्वचा विकार, पोटदुखी, अरूची या सर्वांवर उपयोगी औषध.
१७) **पिंपळ –** बुद्धी वाढवणारे महत्त्वाचे औषध. जखमा धुण्यासाठी वापरतात.
१८) **केवडा –** प्रमेह, रक्तप्रहर, गुल्म यावरील उत्तम औषध.
१९) **जाई –** जाईचा पाला जुन्या जखमा बऱ्या करतो.
२०) **अगस्ती –** लहान मुलांच्या कफाच्या आजारावरील औषध.
२१) **दूर्वा –** शरीरातील उष्णता (पित्तविकार) कमी करण्यासाठी दूर्वांचा रस उपयुक्त ठरतो.

(आरोग्यासाठी या पत्रींचा उपयोग करण्यापूर्वी तज्ज्ञ वैद्यांचा सल्ला घ्यावा.)

## मराठी समश्लोकी श्रीगणेश अथर्वशीर्ष

ॐ नमस्ते गणपते, तूचि प्रत्यक्ष तत्त्व सत्।
तूचि केवल कर्ता बा, तूचि धर्ताहि केवल।
तूचि केवल संहर्ता, तूचि ब्रह्महि सर्वहे।
तू साक्षात् नित्य तो आत्मा।।१।।

ऋत मी सत्य मी वदे ।।२।।

करी रक्षण तू माझे, वक्त्या–श्रोत्यांस रक्ष तू।
दात्या–घेत्यांस तू रक्ष, गुरु – शिष्यांस रक्ष तू।

मागुनी पुढुनी डाव्या, उजव्या बाजूने पण
वरुनी खालुनी माझे, सर्वथा कर रक्षण ।।३।।

जसा वाङ्मय आहेस, तू चिन्मयहि बा तसा।
जसा आनन्दमय तू, तू ब्रह्ममयही तसा।
देवा तू सच्चिदानन्द, अद्वितीयहि तू तसा।
प्रत्यक्ष ब्रह्म तू, ज्ञान-विज्ञान-मयही तसा ।।४।।

सर्व हे जग उत्पन्न, तुझ्यापासुनि होतसे।
त्याची स्थिती तुझ्यायोगे, विलयेल तुझ्यात ते।
भासते ते तुझ्या ठायी, तू भूमि जल अग्नि तू।
तूचि वायु नि आकाश, वाणी स्थाने हि चार तू ।।५।।
तू जसा त्रिगुणां-पार, त्रिदेहांच्याहि पार तू।
तू अवस्था-त्रयां-पार, त्रिकालांच्याहि पार तू।
तू मूलधार चक्रात, देहाच्या नित्य राहसी।
इच्छा-ज्ञान-क्रिया रूपी, शक्ती त्या तूचि तीनही।
ध्याती नित्य तुला योगी, तू ब्रह्मा तूचि विष्णुही।

तू रुद्र, इंद्र, तू अग्नी, तू वायू, सूर्य ,चन्द्रही
तू ब्रह्म, तूचि भू, तूची अन्तरिक्ष, नि स्वर्गही।
तूचि ॐ कार हे बीज, वर्णिती ज्यास वेदही ।।६।।

आधी 'ग' कार उच्चार, 'अ' कार तदनन्तर ।
त्यानंतर अनुस्वार, अर्धचन्द्रे सुशोभित।
ॐ कार-युक्त हे बीज, मन्त्ररूपचि हे तव ।
'ग' कार रूप हे पूर्व, असे मध्यम रूप 'अ'।
अन्त्य रूप अनुस्वार, बिन्दू उत्तर रूपसा।
नाद सांधतसे यांना, सन्धीचे नाम संहिता।
गणेश विद्या ती हीच, आहे गणक हा ऋषी।
छन्द हा निचृद्-गायत्री, देवता श्रीगणेश ही ।
ॐ गं रूपी गणेशाला, नमस्कार सदा असो ।।७।।

एकदन्तास त्या आम्ही, देवाधीशास जाणतो।
आणि त्या वक्रतुण्डाते, आम्ही ध्याने उपासतो।
त्यासाठी सर्वदा आम्हा, तो दन्ती प्रेरणा करो ।।८।।

एकदन्ता चतुर्हस्ता, पाश - अंकुश धारका ।
दन्त नी वरदा मुद्रा, धारका मूषक - ध्वजा।
लम्बोदरा रक्तवर्णा , शूर्प-कर्णा गजानना ।
रक्त - वस्त्रा विघ्न-हर्त्या, गिरिजानन्दन-वर्धना।
रक्त-चन्दन-लिप्तांगा, रक्त-पुष्पा-सुपूजिता ।
भक्तावरी दया कर्त्या ,अच्युता जग-कारणा।
सृष्टिपूर्वी प्रकटल्या, प्रकृती पुरूषा परा ।
या ध्यातो नित्य तो योगी, योग्यांमध्ये वरिष्ठसा ।।९।।
वन्दन व्रातपतिला, गणाधेशास वन्दन ।
वन्दन प्रमथेशाला, एकदन्तास वन्दन।
लम्बोदरा शिवसुता, विघ्नहर्त्यास वन्दन।
वांछिला वर देणाऱ्या, तव मूर्तिस वन्दन ।।१०।।

## ज्ञानप्रबोधिनी – एक चैतन्य स्फुरण

१९६२ मध्ये वाचस्पती विनायक विश्वनाथ तथा आप्पाजी पेंडसे या ध्येयवेड्या दृष्ट्याने पाहिलेले नवनिर्माणाचे स्वप्न प्रबोधिनीच्या रूपाने आकाराला आले. खूप नवीन कल्पना आणि परिश्रम यांचे सिंचन प्रबोधिनीचे संस्थापक संचालक कै. वाचस्पती वि.वि. पेंडसे यांनी प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांच्या आणि विद्यार्थी विद्यार्थिनींच्या मनोभूमीवर केले आहे. त्यातील काही कल्पना बीजरूपात आहेत, काही धुमारू लागल्या आहेत. शिक्षण, संशोधन, ग्रामविकसन, आरोग्य, उद्योग, संघटन अशा बहुविध दिशांनी प्रबोधिनीचे कार्य विस्तारलेले आहे. परंतु प्रबोधिनीच्या घटनेत सांगितलेली प्रबोधिनीची उद्दिष्टे दृष्टीपुढे आणली, तरी झालले काम बिंदुएवढे आहे, राहिलेले काम सिंधूएवढे आहे.

नेतृत्व-विकास, शिक्षणप्रणालीची निर्मिती इत्यादी ग्रंथित केलेल्या उद्देशांच्या मुळाशी स्वदेशात विचार-प्रबोधन व कार्य-प्रबोधन व्हावे, देशाचा कायापालट व्हावा, लोकमानसात नवचैतन्य निर्माण व्हावे असा हेतू आहे.

प्रबोधिनीचे प्रयत्न चालले आहेत ते या दिशेने! आपणा सर्वांचा स्नेह, सहकार्य आणि सोबत या वाटेवर असावी, अशी अगत्याची विनंती.

**ज्ञान प्रबोधिनी**
**५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०**
**दूरभाष : २४२०७१४६, २४२०७१४७**
Email - santrika@jnanaprabodhini.org
Website - www.santrika.org

## ज्ञा. प्र. संस्कार–पोथ्या

**१) शैक्षणिक संस्कार**

०१) वर्षारंभ उपासना (श्रावणी)
०२) वर्षान्त उपासना (उत्सर्ग)
०३) दैनंदिन उपासना (संध्या)
०४) उपनयन संस्कार (मुंज) (८ ते १२ वयोगट)
०५) सामूहिक विद्याव्रत (मुंज) (१३ ते १६ वयोगट)

**२) विविध शांती**

०६) साठी शांती
०७) सहस्रचंद्रदर्शन शांती
०८) वेदपूजन उपासना (उदकशांती)
०९) वास्तुशांती

**३) विविध पूजा**

१०) वटसावित्री पूजा
११) श्रीसत्यनारायण पूजा
१२) हरितालिका पूजा
१३) श्रीगणेशस्थापना पूजा
१४) दीपावलीतील लक्ष्मीपूजन

**४) विविध संस्कार**

१५) नामकरण उपासना (बारसे)
१६) हिंदूकरण संस्कार
१७) विवाह संस्कार
१८) देहदान
१९) अन्त्येष्टी (दाहकर्म)
२०) अन्त्येष्टी (श्राद्ध)
२१) सांवत्सरिक श्राद्ध

## अन्य प्रकाशने

०१) राष्ट्रद्रष्टे विवेकानंद लेखक – वाच. वि. वि. पेंडसे
०२) विवेकानंदांचा राष्ट्रधर्म लेखक – वाच वि. वि. पेंडसे
०३) श्रीमाताजी – श्रीअरविंद काय म्हणाले? लेखक वाच. वि. वि. पेंडसे
०४) उपासनेद्वारा व्याधिमुक्ती – लेखक वाच. वि.वि. पेंडसे
०५) एक अदम्य उत्कट चैतन्य (ज्ञानप्रबोधिनीचे आद्य संचालक वाच. कै. वि. वि. पेंडसे यांचे चरित्र) लेखक– वाच. स्वर्णलता मिशीकर
०६) ज्ञान प्रबोधिनी : एक अभिनव शैक्षणिक प्रयोग (खंड – ३ व ४)
०७) धर्मविधींच्या अंतरंगात – लेखक श्री. य. शं. लेले, सौ. प्रज्ञा जेरे–अंजळ संस्कृत साहित्याचा इतिहास – ७ भागांची पुस्तक माला – लेखिका – वाच. सुरूचि पांडे
०८) – भाग १ वेद व वेदांगे
०९) – भाग २ ब्राह्मणे–आरण्यके–उपनिषदे
१०) – भाग ३ रामायण, महाभारत आणि पुराणे
११) – भाग ४ संस्कृत काव्य
१२) – भाग ५ दशरूपके
१३) – भाग ६ भारतीय तत्त्वज्ञान
१४) – भाग ७ प्राचीन भारतीय विद्या
१५) गरुडपुराणोक्त आयुर्विज्ञान – लेखिका – प्रा. शुभांगी देवरे–तांबट
१६) Earthquakes - Rferences From Rigveda to Rajatarangini लेखक Mr. Y.S. Lele, Mr. V.S. Lele, Mrs. Shubhangi Tambat
१७) तुमच्याही लक्षात राहील – लेखक – वाच. बा.कृ. कोठुरकर
१८) प्राचीन भारतीय द्यूत – लेखक वाच. म. अ. मेहेंदळे
१९) सुभाषितमाला – अनुवाद – श्री. द. मो. पेठे
२०) हस्त्यायुर्वेद – अनुवाद – वाच. अ.पां. देशपांडे, वाच, रा.ब. गोगटे
२१) Engineering Geometry of Yajna-kundas & Yajna-mandapas लेखक Dr. R.P. Kulkarni

ज्ञानप्रबोधिनी, संस्कृत संस्कृति संशोधिका, ५१० सदाशिव पेठ, पुणे – ४११०३० दूरभाष : २४२०७१४६, २४०७१४७